प्रकरण 2 (मॅन्युअल 1)

**संस्थेची ठळक कार्ये व कर्तव्ये**

**रचनात्मक तक्ता**

अनुज्ञापन खात्यातील कार्यप्रणाली खालील तक्त्याप्रमाणे आहे.

**महानगरपालिका आयुक्त**

|

**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर )**

उप आयुक्त (विशेष)

उप आयुक्त (फेरीवाला अतिक्रमण निर्मूलन)/(फेरीवाल्यांचे नियमन)

शहर/पूर्व /पश्चिम उपनगरे

**अनुज्ञापन अधीक्षक**

|

सह अनुज्ञापन अधीक्षक

उप अनुज्ञापन अधीक्षक (शहर)

उप अनुज्ञापन अधीक्षक (पश्चिम उपनगरे)

उप अनुज्ञापन अधीक्षक (पूर्व उपनगरे)

|

सहा.अनु.अधीक्षक (परि-१)

सहा.अनु.अधीक्षक (परि-२ व ३)

सहा.अनु.अधीक्षक (परि-४-७)

सहा.अनु.अधीक्षक (परि-५ व ६)

प्रशासकीय अधिकारी

|

मुख्य लिपिक

|

लिपिक

|

शिपाई

**विभाग पातळीवर**

**वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन)**

|

**वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण)**

|

**मुख्य लिपिक (लेखा)**

|

निरीक्षक (अनुज्ञापन )　　निरीक्षक (वाहन)　　रोखपाल / लिपिक

| | |
शिपाई　　गोदाम लिपिक　　शिपाई

|
कामगार

1. **<u>अनुज्ञापन खात्याची कार्ये / ठळक वैशिष्टये :</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुज्ञापन खात्यामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 61 (जे) आणि (ओ) अन्वये बंधनकारक असलेली कर्तव्ये पार पाडली जातात.

अनुज्ञापन खाते हे महसूल जमा करणारे खाते नसून विकेंद्री रचना पध्दतीने (Decentralized Set Up) नियंत्रण आणि नियमन करणारे खाते आहे. तथापि, ही सर्व कार्ये संबंधित विभाग कार्यालयीन पातळीवर पार पाडली जातात. तथापि, उपायुक्त / अति.आयुक्त (शहर) आणि महानगरपालिका आयुक्त यांच्या मान्यतेने मध्यवर्ती कार्यालयामार्फत धोरणात्मक निर्णय – आस्थापनेची कामे पार पाडली जातात.

**<u>व्यवसाय आणि साठयांची अनुज्ञापत्रेः-</u>**

महापालिकेने एप्रील 2007 मध्ये संगणकीकरणांतर्गत नागरी सुविधा केंद्र विभाग पातळीवर सॅप प्रणालीद्वारा अनुज्ञापत्रांचे नूतनीकरण / वितरण करण्याची व्यवस्था उपलब्ध करुन दिलेली आहे.

महानगरपालिका अधिनियम कलम 394 अन्वये व्यवसाय आणि साठयांची अनुज्ञापत्रे आवश्यकता असल्यास प्रमुख अग्निशमन दल अधिकारी आणि अन्य संबंधित प्राधिकरणाचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन विभाग पातळीवर सॅप प्रणालीअंतर्गत दिली जातात. दिनांक 15 ऑगस्ट 2001 पासून राबविण्यात आलेल्या एक खिडकी योजनेअंतर्गत बांधकाम अधिकृत असल्याबाबत 01.01.1995 पूर्वीचे कागदोपत्री पुरावे सादर केल्यास, त्या आधारे व्यवसाय आणि साठयांसाठी अनुज्ञापत्र देण्याची पध्दती अनुज्ञापन खात्याद्वारे अवलंबण्यात येत आहे. याकरिता सॅप प्रणाली अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या सूचीनुसार अनुज्ञापत्र देण्याची प्रकिया 30 दिवसात पूर्ण होणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत अनुज्ञापत्र देताना धोका

लक्षात घेऊन कायदेशीर नियमानुसार आग प्रतिबंधक उपाय / अटी अनुज्ञापन खात्याद्वारे लेखी मांडण्यात आल्यानंतर, संबंधित वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन), अनुज्ञापत्र देतांना प्रमुख अग्निशमन दल अधिका-यांशी सल्लामसलत न करता सदर उपाययोजनांची शिफारस करु शकतात. तथापि, लेखी मांडण्यात आलेल्या नियमात जे प्रस्ताव अंतर्भूत होणार नाहीत अशा प्रस्तावांवर प्रमुख अग्निशमन दलाचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्यात आल्यानंतर अनुज्ञापन खात्यांमार्फत कार्यवाही करण्यात यावी.

अनधिकृत व्यवसाय आणि साठयांच्या विरोधात संबंधित विभागाच्या अनुज्ञापन निरीक्षकांद्वारे कलम 394 आणि 471 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येतो. ज्वालाग्राही / स्फोटक आणि धोकादायक सामग्री यांच्या विरोधात कलम 394 (3), 394 (4) यांच्या अंतर्गत जप्तीची कारवाई करण्यात येते. जागेची पहाणी करतांना अशा सामग्रीचा साठा केल्याचे आढळल्यास सदर बाब कलम 516 अअ अंतर्गत दखलपात्र गुन्हा असल्याने संबंधित निरीक्षकाद्वारे त्या विभागाशी संबंधित पोलीस स्थानकात पहिली खबर (एफ.आय.आर.) दाखल करण्यात येते आणि पोलीस पंचनामा झाल्यानंतर सामग्री जप्त करण्यात येते. तदनंतर जप्त करण्यात आलेली सामग्री देवनार येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्फोटकांच्या कोठारांमध्ये जमा करण्यात येते आणि न्यायालयाचे आदेश व पोलिसांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर आवश्यक ते शुल्क आकारुन सोडण्यात येते. अनुज्ञापत्रित व्यवसाय आणि साठयांच्या बाबतीत परवानाधारक व्यावसायिक अनुज्ञापत्रातील अटींचे उल्लंघन करतांना आढळल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त (forfeit) करणे अत्यावश्यक आहे.

**जागांची पहाणी करण्याची पध्दत खालीलप्रमाणे आहे :-**

महानगरपालिका अधिनियम कलम 394 अन्वये सॅप संगणकीय प्रणालीमध्ये अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित निरीक्षकाने ज्या जागेसाठी अनुज्ञापत्र द्यावयाचे आहे त्या जागेची पाहणी करुन ज्या ठिकाणी व्यवसाय आणि साठा करावयाचा आहे त्या ठिकाणची सत्यस्थिती मांडणार / निरीक्षण अहवाल तयार करावा. निरीक्षकाने सदर जागेचा अर्ज प्राप्त झाल्यावर सॅप संगणकीय प्रणालीमध्ये नमूद केलेल्या पुढील तरतूदीनुसार असल्यास सदर अनुज्ञापत्रीत जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन अर्ज पुढील मंजूरीकरिता वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन) यांच्या सहमतीकरिता सादर करावा. अन्यथा अर्जदारास कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी लेखी पत्राद्वारे त्वरित कळवावे. याकरिता अर्जदारास 7 दिवसांची मुदत द्यावी.

सॅप संगणकीय प्रणालीमध्ये असलेल्या 394 कलमांतर्गत अर्जाची / कागदपत्रांची तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

1. जर अर्जदाराचा व्यवसाय औद्योगिक वसाहतीमध्ये येत असल्यास परिरक्षण पावती, करारनामा, औद्योगिक वसाहतीला महापालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागातर्फे मिळालेली मंजूरी, प्रमुख अग्निशमन दल यांच्याकडून मिळालेले ना हरकत प्रमाणपत्र व औद्योगिक वसाहतीमध्ये लगतच्या गाळेधारकाला दिलेल्या मान्यताप्राप्त अनुज्ञापत्र या बाबी अनिवार्य आहेत.

2. जर अर्जदाराचा व्यवसाय घोषित झोपडपट्टीमध्ये असल्यास ती जागा कोणत्या सरकारी प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे किंवा कसे त्याचे लेखी अभिप्राय सादर करावे व सोबत 01.01.1995 च्या पूर्वीचा अर्जदाराचा त्या जागेवरील स्वतःच्या नावाचा वास्तव्याचा पुरावा असल्याबाबतचे सॅप प्रणालीमध्ये अंतर्भूत केलेल्या सुचीनुसार कागदोपत्री पुरावे सादर करावेत व सोबत सदर व्यवसाय करण्याकरिता प्रमुख अग्निशमन अधिकारी यांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे.

3. जर अर्जदाराचा व्यवसाय अघोषित झोपडपट्टीच्या अंतर्गत असल्यास व ती जागा एखाद्या सरकारी प्राधिकरणाच्या अखत्यारीत असल्यास त्याबाबतचे सॅप प्रणालीमध्ये अंतर्भूत केलेल्या सुचीनुसार 01.04.1962 पुर्वीचे स्वतःच्या नावे असलेले कागदोपत्री पुरावे सादर करावेत सोबत सदर व्यवसाय करण्याकरिता प्रमुख अग्निशमन अधिकारी यांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे.

4. निरीक्षक (अनुज्ञापन) यांनी त्यांच्याशी संबंधित विभागात अनुज्ञापत्रधारक व्यवसाय आणि साठे करत असतील अशा ठिकाणी नियमित भेट द्यावी व निरीक्षण अहवाल सादर करावा. तसेच अनधिकृत व्यवसाय आणि साठे करत असतील अशा ठिकाणी नियमित भेट द्यावी व निरीक्षण अहवाल सादर करावा. तसेच अनधिकृत व्यवसाय आणि साठे प्रकरणी मालकावर मुंबई महानगरपालिका कलम 394 / 471 खाली न्यायालयीन खटला भरण्यात यावा. काही प्रकरणांमध्ये मुंबई महानगरपालिका कलम 471 अन्वये खटला भरल्यानंतर मुंबई महानगरपालिका कलम 472 अन्वये पुनःपुन्हा न्यायालयीन खटला भरता येतो.

**(एक) <u>फेरीवाल्यांसाठी अनुज्ञापत्र :</u>**

**(अ)** कलम 313 अ /313 ब अन्वये फेरीवाल्यांना अनुज्ञापत्र देता येते. तथापि सद्यःस्थितीत 313 अ / 313 ब अंतर्गत अनुज्ञापत्रे देण्यात येत नाहीत. सन 1970 पूर्वी अशी अनुज्ञापत्रे देण्यात येत होती. परंतु मुंबई शहराची होणारी वाजवीपेक्षा जास्त वाढ लक्षात घेता ही अनुज्ञापत्रे देणे बंद करण्यात आले आहेत. सद्यःस्थितीत कलम 313 ब अन्वये अपंग व्यक्तींना दूरध्वनी केंद्र आणि बैठी गटई परवाने देता येतात. तथापि, फेरीवाला विभाग योजना माननीय सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याकारणाने दिनांक 09.12.2003 आणि दिनांक 30.07.2004 च्या आदेशान्वये सद्यःस्थितीत ही अनुज्ञापत्रे देण्याचे बंद करण्यात आले आहे. फेरीवाल्यांना विविध प्रकारची जसे स्टॉल्स, बैठी अनुज्ञापत्रे, चारचाकी हातगाडया, सार्वजनिक दूरध्वनी केंद्रे आणि गटई बैठ्या जागा / स्टॉल्स आदी मिळून एकूण 11843 अनुज्ञापत्रे देण्यात आलेली आहेत.

**(ब)** अनधिकृत फेरीवाल्यांविरुध्द त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता कलम 314 (सी) अन्वये विभागीय स्तरावर कारवाई करता येते आणि महानगरपालिका आयुक्तांनी मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 490(1) अन्वये नमूद केलेला उचित विमोचन आकार भरल्यानंतर पकडलेला माल सोडविता येतो.

यासंबंधी महापालिकेच्या रस्ते व फूटपाथवर व्यवसाय करणा-या अनधिकृत फेरीवाल्यांवर संबंधित विभागातील वाहन निरीक्षकांनी वारंवार अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करणे आवश्यक आहे. अशी कारवाई फक्त महानगरपालिकेच्या रस्ते व पदपथावरील फेरीवाल्यांवर करण्याची खबरदारी वाहन निरीक्षकांनी घ्यायची आहे. कलम 314 (सी) अन्वये अनुज्ञापन खात्यासंबंधित करावयाची कारवाई फक्त रस्ते व पदपथावरच करता येते. निरीक्षक (अनुज्ञापन) यांनी अनुज्ञापत्रित

फेरीवाल्यांची देखील पाहणी करावयाची आहे आणि ते वाटप करण्यात आलेल्या जागेपेक्षा जास्त जागा वापरत असल्याचे आढळल्यास तसेच अनुज्ञापत्रात मान्यता दिल्या गेलेल्या व्यतिरिक्त अन्य बाबींचा व्यवसाय करतांना अथवा अनुज्ञापत्रातील अटींचे उल्लंघन करतांना आढळल्यास त्यांच्या विरोधात कारवाई करावयाची आहे.

**(दोन) दुकानांच्या अवकानांवर (प्रोजेक्शन्सवर) नियंत्रण ठेवणेः**

मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 या कलम 313(1)(ब)(क) अन्वये मुंबई महानगरपालिकेच्या पदपथ व रस्ते हयावरील दुकानांच्या अवकानांवर, दुकानफळी, दर्शक कपाटावर अनुज्ञापन खाते नियंत्रण ठेवते. हया संदर्भात दुकान मालकाने दुकानाच्या जागेचे व त्याच्या मालकी हक्काचे कागदोपत्री पुरावे सादर केल्यास त्याला त्याच्या दुकानालगतच्या जागेवर दुकानफळी, दर्शक कपाटे, छप्पर, सरक ढापणी, दरवाजे इत्यादींना परवानगी देण्यात येते. तसेच त्यांचे मासिक / वार्षिक तत्वावर नुतनीकरण करण्यात येते.

**(तीन) मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 328आणि 328ए अन्वये जाहिराती प्रदर्शित करण्याबाबत -**

1. **सर्वसाधारण**

जाहिरात फलक, किऑक्स, निऑन साईन, ग्लोसाईन, फुगा इत्यादीमार्फत जाहिरात प्रदर्शित करणे हा आजमितीला व्यवसायाचा अत्यावश्यक आणि अविभाज्य भाग आहे. अशा प्रकारच्या जाहिराती प्रदर्शित करण्याकरिताची तरतूद आणि नियमन महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 328/328(अ) अंतर्गत केलेली आहे.

2. **व्याख्या**

जाहिरात म्हणजे कोणतेही साधन किंवा उदघोषणा किंवा शब्द, अक्षर, नमुना (मॉडेल) भित्तीपत्रके, जाहिरात फलक, बॅनर्स, तात्पुरत्या कमानी, प्रकाशित चिन्हे, नामफलक, दिशादर्शक फलक, फुगे इत्यादी हयामधील कोणत्याही प्रकारच्या साधनांनी जाहिरात प्रदर्शित करणे.

## 3. आकाश चिन्ह

आकाश चिन्ह म्हणजे जे कोणत्याही स्तंभ, खांब, सर्वसाधारण चौकट किंवा इतर आधारवर संपूर्णतः किंवा अंशतः, कोणत्याही जमिनीवर इमारतीवर किंवा बांधकामावर आधारित किंवा जोडलेले आहे असे शब्द, अक्षर नमुना, साधन किंवा जाहिरातीचे प्रतिनिधीत्व करणारे दृश्य, उदघोषणा किंवा रस्त्याच्या काही अंतरावरुन आकाशापलिकडे दिसेल असे उंचावरील चिन्ह किंवा अशा स्तंभ, खांब किंवा सर्वसाधारण चौकट किंवा इतर आधार हयांचा सर्व भागाचा समावेश आहे. आकाश चिन्ह हयामध्ये फुगे, पॅराशुट किंवा जाहिरातीकरिता संपूर्णतः किंवा अंशतः वापरण्यात येणारे अशाप्रकारचे साधन, उदघोषणा किंवा जमीन किंवा इमारत किंवा बांधकाम किंवा कोणत्याही मार्गावरील दिशादर्शकाचा समावेश होतो. परंतु खालील बाबींचा समावेश होत नाही.

(अ) ज्याचा कोणत्याही जाहिरातीत, उदघोषणेत किंवा दिशादर्शकात कोणतेही निशाणाचा खांब (ध्वज), खांब किंवा वातकुक्कुट संपूर्णतः किंवा अंशतः अंगिकारल्यास किंवा वापरल्याखेरीज.

(ब) कोणतेही चिन्ह किंवा फलक, चौकट किंवा योजनाबध्दतेने टांगलेली किंवा भिंतीच्या किंवा कोणत्याही इमारतीच्या सज्जावरील किंवा भिंतीच्या ब्लॉकिंग भागावरील (Blocking Course) किंवा छताच्या उंचवटयावरील वस्तू.

तथापि, सदर फलक, चौकट किंवा इतर योजनाबध्दतेने टांगलेली वस्तू हे एकसंघ असावेत, खुले असू नयेत. भिंतीच्या कोणत्याही भागाच्या किंवा छताच्या उंचवटयाच्या किंवा ज्यावर ते बसविले आहेत किंवा आधारलेले आहेत त्याच्या तीन फूट उंचीपेक्षा उंच असू नयेत.

(क) संपूर्णतः रेल्वेच्या कामकाजाशी निगडीत कोणताही शब्द, अक्षर, नमुना, चिन्ह किंवा उपरोक्तप्रमाणे दर्शविलेले आणि रेल्वे, रेल्वे स्टेशन, यार्ड,

प्लॅटफॉर्म व स्टेशन आणि रेल्वे कार्यालयाशी जाणारा मार्ग आणि जे रस्त्यावर किंवा सार्वजनिक जागी वसलेले नाही ते.

(ड) ज्यावर सदर जागा किंवा इमारत विकावयाची आहे, भाडयाने द्यावयाची आहे अशी नोटीस चिकटविलेली आहे ती जागा किंवा इमारत.

**4. कायद्यामधील तरतूद**

कलम 328 - सर्व प्रकारच्या आकाशचिन्हांबाबत विनियमन.

कलम 328 ए - आकाशचिन्हाव्यतिरिक्त अन्य सर्व प्रकारच्या जाहिरातीचे विनियमन व नियंत्रण

**5. ज्याकरिता परवानगीची आवश्यकता लागत नाही अशा जाहिराती –**

प्रकाशित जाहिराती आणि आकाशचिन्हे (स्कायसाईन) वगळता खालील प्रकारच्या जाहिरातींना महानगरपालिकेची परवानगी घेण्याची गरज नाही.

(अ) खिडकीत प्रदर्शित केलेली जाहिरात.

(ब) रेल्वेच्या कामकाजाशी संबंधित आणि रेल्वेच्या जागेत प्रदर्शित केलेली परंतु रस्त्यावरुन दर्शनीय नसलेली जाहिरात.

(क) व्यापारी जागेत अगर जागेवर करण्यात येत असलेला धंदा किंवा व्यवसायाशी संबंधित प्रदर्शित केलेली जाहिरात.

(ड) जागेची विक्री किंवा भाडयाने देण्याबाबत किंवा त्यासंबंधात कोणत्याही प्रकारची कोणत्याही जागेत वा जागेवर प्रदर्शित केलेली जाहिरात.

**6. जाहिरातीचे प्रकार :-**

(1) **बॅनर** म्हणजे सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी, काही जाहिराती किंवा उदघोषणा किंवा लिखीत मजकूर हयांचा समावेश असलेले कापड किंवा इतर कोणतीही वस्तू.

(2) **इमारतीवरील जाहिरात (रॅप)** म्हणजे कोणत्याही इमारतीच्या दर्शनी भागावरील किंवा बांधकाम किंवा दुरुस्ती चालू असलेल्या इमारतीच्या

परांचीवरील किंवा काचेच्या तावदानावर किंवा खिडक्यांवर बसविलेल्या किंवा  चिकटविलेल्या जाहिराती.

(3) **जाहिरात फलक  उभारण्यासाठी ज्याचा वापर केला जातो त्या खांबांचा वापर न करता इमारतीवर केलेली निऑनयुक्त जाहिराती** म्हणजे जे बांधकाम पुरातन नाही, ज्यावर निऑन बल्बचा वापर केला आहे, तसेव जे दिवे रात्री पेटवले जातात आणि जे एकाच वेळी एक किंवा अनेक वेगवेगळया रंगांमध्ये प्रदर्शित होतात अशा इमारतीच्या दर्शनी भागातील जाहिरात.

(4) **बस आश्रयस्थानांवरील जाहिरात** म्हणजे बस आश्रयस्थानांवरील प्रदर्शित केलेली अनुवादित किंवा तत्सम प्रकारची जाहिरात.

(5) **दिशादर्शक फलक** म्हणजे खाजगी आणि व्यावसायिक आस्थापनांनी त्यांची कार्यालये किंवा व्यावसायिक स्थाने दर्शविण्यासाठी उभारलेले फलक.

(6) **इलेक्ट्रॉनिक जाहिरात फलक** म्हणजे एखाद्या बांधकामावर कायमस्वरुपी उभारलेले इलेक्ट्रॉनिक शक्तीद्वारे चालविले जाणारे जाहिरात फलक, इलेक्ट्रॉनिक किंवा निऑन दिवे, एलईडी किंवा एलसीडी कार्यपध्दती इत्यादी विद्युतीय साधनांद्वारा केलेली जाहिरात.

(7) **कमानीवरील जाहिरात** म्हणजे रस्त्यालगत उभारलेल्या खांबावरील आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूस धातूच्या खांबावरील खांबाला जोडलेले बीमच्या आकाराचे वाहतुकीच्या दिशेच्या विरुध्द बाजूस बसविलेली जाहिरात.

(8) **ग्लोसाईन बॉक्स जाहिरात** म्हणजे प्लास्टिकपासून तयार केलेल्या पारदर्शक किंवा प्रकाशभेदी असलेल्या धातूच्या पेटीवर बसविलेली आणि मागच्या बाजूने विद्युत दिव्याद्वारे प्रकाशित केलेली जाहिरात.

(9) **जाहिरात फलक**  म्हणजे जाहिरातीच्या उद्दिष्टाकरिता किंवा कोणत्याही ठिकाणी जनतेला आकर्षित करण्याच्या दृष्टीकोनातून माहिती देण्यासाठी, व्यक्ती, सार्वजनिक कामगिरी, विक्रीचा माल इत्यादीची माहिती देण्यासाठी चित्र, शब्द किंवा माहितीसह जमिनीवरील बांधकामाचा कोणताही पृष्ठभाग किंवा इमारतीच्या छताचा कोणताही भाग किंवा छज्जावरील भाग हयावर उभारलेले जाहिरात फलक त्यामध्ये पारदर्शक

स्वरुपाच्या एक किंवा अधिक रंगाचा वापर केलेल्या निऑन बल्ब/दिवे/लाईटस् इत्यादींचा वापर केलेल्या जाहिरातींचाही समावेश होतो.

(10) **भित्तीपत्रक** म्हणजे कागदाचा तुकडा किंवा इतर कोणतीही वस्तू जी जाहिरातीसाठी अथवा सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी वापरली जाते.

(11) **चक्रांकित जाहिरात** प्रदर्शित करणे म्हणजे रोलरद्वारे गुंडाळी होत प्रदर्शित होणारी पेटीवजा नक्षीदार जाहिरात ही प्रकाशित असेल किंवा अप्रकाशित किंवा बॅकलिट पध्दतीची असेल.

(12) **तात्पुरत्या कमानी** म्हणजे मान्यवरांच्या स्वागतासाठी किंवा जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी रस्त्यावर उभारलेली तात्पुरती बांधकामे.

(13) **तात्पुरती (मोठया प्रमाणावरील) जाहिरात** म्हणजेच एखाद्या उत्सवाच्या किंवा समारंभाच्या वेळी मर्यादित भागात, मर्यादित कालावधीकरिता केलेली जाहिरात ही परवानगी तात्पुरते फलक, कमानी, कापडी फलक किंवा खांबावरील झेंडे याकरिता देता येईल. मोठया प्रमाणावरील व्यावसायिक फलकामध्ये सर्व्हीस व्हॅन आणि / किंवा मालाचे वितरण करणारी वाहने यासारख्या फिरत्या माध्यमांद्वारा केल्या जाणा-या जाहिरातीचा समावेश असेल.

(14) **त्रिमिती जाहिरात (Tri-Vision Advertisement) (Tir-Ad)** म्हणजे यामध्ये एकामागोमाग एक अशा पध्दतीने फिरणारे त्रिकोणी पॅनेल यामध्ये त्रिकोणी भागाचे तीन दर्शनी भाग एकामागोमाग एक असे दिसतात व त्याद्वारे तीन वेगवेगळया जाहिरातींचे संदेश प्रदर्शित होतात. सदर जाहिरात फलक प्रकाशित किंवा अप्रकाशित असू शकतील.

(15) **भिंतीवरील रंगविलेल्या जाहिराती –** म्हणजेच थेट इमारतीच्या भिंतीवर किंवा कोणत्याही बांधकामावर किंवा स्थापत्य बांधकामावर रंगकामाद्वारे प्रदर्शित केलेली जाहिरात.

**7.** फिरते जाहिरात फलक म्हणजे जी जाहिरात उत्तम प्रदर्शनासाठी महत्वाच्या जागी उभी करता येईल किंवा चालविता येईल, अशा वाहनावर किंवा वाहनामागे पॅनेलवर लावता येईल असा एकेरी अथवा दुहेरी बाजूचा जाहिरात फलक.

8. शोकेसेस अथवा शोरुम ही सामान्यतः दुकानांच्या समोरील बाजूस असतात आणि त्यांचा उपयोग रोषणाईच्या सहाय्याने वस्तूचे प्रदर्शन करण्याकरिता केला जातो.

आयुक्तांच्या मते रात्री माल व लेबले दिसण्यासाठी आवश्यक असेल तेवढया प्रकाशापेक्षा जास्त प्रकाशाच्या सहाय्याने प्रदर्शित केले असता सदर पध्दतीची जाहिरात कलम 328 4(बी)(ii) अन्वये वसुलीस पात्र ठरते. शोकेस किंवा शोरुम 25 वॅट किंवा त्याहून जास्त वीज वापरुन प्रकाशित केली असता ती महानगरपालिका अधिनियम कलम 328(ए) अंतर्गत शुल्क वसुलीस पात्र ठरते. प्रकाशित शोकेसेस अथवा शोरुमकरिता सार्वजनिक रस्त्याच्या समोरील बाजूस येणा-या काचेच्या क्षेत्रफळानुसार सदर प्रकाशित शोकेसेस अथवा शोरुम यांचे जाहिरात शुल्क आकारण्यात यावे.

**सारांशः**

जाहिरात फलकांच्या आणि अन्य साधनांमार्फत करण्यात येणा-या जाहिरातींच्या वाढत्या संख्येवर लक्ष किंवा नियंत्रण ठेवण्यासाठी व्यावहारिक दृष्टीकोन विचारात घेवून नवीन मार्गदर्शक तत्त्वे -2007 सुसूत्रपणे तयार केली आहेत. यापूर्वी सन 2000 पासून कार्यान्वित असलेली मार्गदर्शक तत्त्वे रद्दबातल करुन सदर नवीन मार्गदर्शक तत्त्वे – 2007 दि.10.01.2008 पासून प्रसारित करण्यात आली आहेत. जाहिरात क्षेत्राचा दर्जा, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या श्रेणीपर्यंत सुधारणे, हा त्यामागचा उद्देश आहे. एकावर एक जाहिरात फलकास परवानगी तसेच त्याचे एकत्रिकरण करण्यास मनाई करण्यात आली आहे. जाहिरात फलकाची संरचना एकखांबी किंवा द्विखांबी करण्याचे प्रस्ताविले आहे. नवीन मार्गदर्शक तत्त्वातील यासारख्या सर्व तसेच काही तत्सम तरतूदींमुळे एका विशिष्ट ठिकाणी जाहिरात फलकांचे एकत्रिकरण होण्यापासून प्रतिबंध होईल. शहराचे सौंदर्य वाढविण्याच्या दृष्टीकोनातून जाहिरात फलकाचे आकारमान प्रत्येक परिमंडळानुसार ठरविण्यात आले आहे.

मुंबई शहरात जाहिरात फलकांच्या संख्येत भूछत्राप्रमाणे वाढ झाल्यामुळे तसेच गच्चीवरील / छतावरील जाहिरात फलकांमुळे इमारतींचे होणारे नुकसान लक्षात घेऊन यापूढे गच्चीवर / छतावर नवीन जाहिरात फलकास परवानगी देण्यात येणार नाही. तसेच 2 जाहिरात फलकांमधील कमीत कमी अंतर 20 मीटर ऐवजी 100 मीटर पर्यंत करण्यात आले आहे. यापुढे धार्मिक जागा, पुरातत्व हद्दितील क्षेत्र याठिकाणी नवीन जाहिरात फलकांना परवानगी देण्यात येणार नाही. स्मशानभूमी, दफनभूमी याठिकाणी परवानगी देतांना ती मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे लगतच्या आवाराच्या भिंतीवर व रस्त्यांच्या समांतर असे देण्यात येईल. जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासन किंवा महानगरपालिका परवाना प्राप्त बांधकाम अभियंत्यांनी दिलेल्या संरचनात्मक स्थैर्यता प्रमाणपत्राची छाननी झाल्याशिवाय कुठलाही नवीन जाहिरात फलकास परवानगी दिली जाणार नाही किंवा त्यांचे नूतनीकरण होणार नाही.

खाली नमूद केल्याप्रमाणे 5 भागात विभागण्यात आलेली मार्गदर्शक तत्त्वे-2007 ची प्रत जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय, महापालिका मुख्य कार्यालय, विस्तारित इमारत, पोटमाळा, महापालिका मार्ग, मुंबई – 400 001 येथे रु.315/- (5%व्हॅट सहित) च्या किंमतीवर सर्व जनतेसाठी उपलब्ध आहे.

भाग – 1 – सर्वसाधारण
भाग – 2 – जाहिरात परवानगीचे सर्वसाधारण नियम
भाग – 3 – अर्ज करण्याची पध्दत
भाग – 4 – अर्ज निकालात काढण्याची कार्यपध्दती
भाग – 5 – अपील

केंद्र सरकारद्वारा मे 2014 रोजी पदपथ विक्रेते (उपजिविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम 2014 लागू करण्यात आलेला आहे.सदर अधिनियमातील कलम 36 (1) नुसार महाराष्ट्र शासनाद्वारे महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, 2016 अन्वये दि.3 ऑगस्ट 2016 रोजी नियमावली प्रस्तूत करण्यात आलेली आहे. सदर नियमावलीनुसार पुन्हा नवीन शहर फेरीवाला समिती गठित करण्याचे आदेश राज्यशासनाकडून प्राप्त झालेले आहेत. उपरोक्त प्रक्रिया जरी चालू असली तरी महानगरपालिका अधिनियम

1888, कलम 314(क) अन्वये अनुज्ञापत्रधारक फेरीवाला वगळता 1 मीटर x 1 मीटर आकारमानापेक्षा जास्त जागा व्यापणा-या अनधिकृत फेरीवाल्यांवर तसेच पदपथ / रस्त्यांवरील दुकानांचा आणि सदनिकांचा वहिवाटीचा प्रवेश मार्ग अडवून व्यवसाय करणा-या अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई  नियमितपणे पार पाडली जाते.

**अनुज्ञापन अधीक्षक**